अध्यापकांमधून अधिसभेवर व विद्यापरिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरिता Electoral Roll तयार करण्यासाठी माहिती पाठविण्याबाबत.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON–425001**

# निवडणूक शाखा

# अधिसूचना

आपणास माहितच आहे की, महाराष्ट्र शासनाने दि. ०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ लागू केलेला आहे. त्यातील कलम **२८ (२) नुसार अधिसभेचे** गठण करणे आवश्यक असून त्यातील उपकलम (द) नुसार प्राचार्य आणि मान्यता प्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्याखेरीज अध्यापक गटाने त्यांच्यामधून **१०** अध्यापक निवडून द्यावयाचे आहेत. त्यादृष्टीने सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील सर्व अध्यापकांची यादी तयार करुन त्यातून सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण (Electoral Roll) तयार करावयाचा आहे.

तसेच कायदा कलम **३२ (३) नुसार विद्यापरिषदेचे** गठण करणे आवश्यक असून त्यातील उपकलम (छ) नुसार अध्यापक गटाने त्यांच्यामधून **१५** वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले प्रत्येक विद्याशाखेचे दोन अध्यापक निवडून द्यावयाचे आहेत.

तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना या अधिसूचनेद्वारे विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेमध्ये कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर www.nmu.ac.in/election या Link मध्ये विहित केलेल्या नमूना अर्जामध्ये आवश्यक ती सर्व माहिती नमूद करुन त्याची प्रिंट काढून आवश्यक ते दस्तऐवज अर्जासोबत जोडून एकत्रितरित्या विद्यापीठास शनिवार, दिनांक २४/०६/२०१७ रोजी किंवा त्यापूर्वी पोहचेल अशा बेताने सादर करावी.

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY JALGAON-425001 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

..२..

अध्यापकांमधून विविध प्राधिकरणावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतूदी पत्रासोबत जोडलेल्या आहेत. प्रत्येक अध्यापकांच्या माहितीसोबत खालील दस्तऐवज स्वाक्षांकीत करुन जोडणे आवश्यक आहे. (संबंधिताने स्वत: स्वाक्षांकीत केलेले कागदपत्र ग्राह्य धरण्यात येतील.)

१) व्याख्याता/सहायक प्राध्यापक/प्रपाठक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक म्हणून विद्यापीठाच्या मान्यता पत्राची प्रत.
२) पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असल्यास पदव्युत्तर अध्यापक म्हणून विद्यापीठाच्या मान्यता पत्राची प्रत.
३) अध्यापक मागास प्रवर्गातील असल्यास त्यांच्या जातीचा दाखला व जातपडताळणी प्रमाणपत्राची प्रत.

वरीलप्रमाणे माहिती विहित मुदतीत आवश्यक त्या दस्तऐवजांसह विद्यापीठाच्या निवडणूक विभागात पाठवावी. ज्या महाविद्यालयाच्या अध्यापकांची माहिती विहित मुदतीत प्राप्त होणार नाही, त्या महाविद्यालयातील अध्यापकांच्या नावाचा संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनलेल्या निर्वाचक गणामध्ये (Electoral Roll) समावेश होणार नाही, त्यास सर्वस्वी महाविद्यालय जबाबदार राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

कायदा/परिनियम/अधिसूचनेमधील कोणत्याही तरतुदीचा अर्थ काढण्यासंदर्भात विवाद निर्माण झाल्यास कायदा/परिनियम/अधिसूचनेची इंग्रजी प्रतीमधील तरतूद प्रमाण मानण्यात येईल.

(प्रा. अं. बा. चौधरी)
प्र.कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

जा.क्र.उमवि/२/निवडणूक/ १० /२०१७
दिनांक: ०६/०६/२०१७

**सोबत :-** अध्यापकांमधून विविध प्राधिकरणावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी / पात्रता शर्ती संदर्भातील प्रत.

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७२११,१२ आणि १४ फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211,12 , 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

- **अध्यापकांमधून विविध प्राधिकरणावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी**

कलम २ (१८) : **"अध्यापकांचा गट "** याचा अर्थ , जे संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यता परिसंस्थांचे अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील, अशा संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण असा आहे.

कलम २ (६१) : **"अध्यापक "** याचा अर्थ, विद्यापीठाच्या कोणत्याही विभागातील संचालित, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयातील, स्वायत्त परिसंस्थेतील किंवा विभागातील किंवा विद्यापीठातील मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल,प्राचार्य, परिसंस्थेचा संचालक, ज्ञान स्रोत केंद्राचा संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचा संचालक, विद्यापीठाचा उप किंवा सहायक ग्रंथपाल व महाविद्यालयाचा ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक किंवा निर्देशक, असा आहे ;

कलम २८ (२)(द) : **अधिसभा**

प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्याखेरीज अध्यापक गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे दहा अध्यापक, ज्यांपैकी प्रत्येकी एक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती असेल आणि एक महिला असेल;

कलम ३२ (३) (छ) : **विद्यापरिषदः**

अध्यापक गटाने आपल्यामधून निवडून द्यावयाचे पंधरा वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे दोन अध्यापक, त्यांपैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा निरधिसूचित जमातीची (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची किंवा इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल, परंतु प्रत्येक विद्याशाखेचे आरक्षण हे चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात येईल;

परंतु, या खंडान्वये, प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणा-या अध्यापकांपैकी, एक अध्यापक ही, चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल अशी महिला असेल ;

..२..

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle) JALGAON-425001

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७२११,१२ आणि १४ फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211,12 , 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in

**महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील "विद्यापीठाच्या अधिसभा/विद्यापरिषदेचा सदस्य म्हणून निवडून येणाच्या पात्रता शर्ती :**

**कलम २८ (२)(द) : अधिसभा :**

अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले

(क) पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा.

**किंवा**

एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा.

(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

**कलम ३२ (३)(छ) : विद्यापरिषद :**

अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले

(क) पीएच.डी. पदवीधारक असावा,

(ख) एकूण किमान १५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा.

(ग) मान्यताप्राप्त पीच.डी.मार्गदर्शक असेल ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली असेल,

(घ) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरुप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत.

(ड) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

***

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY · JALGAON-425001 · 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

6/6/17
REGISTRAR
North Maharashtra University
Jalgaon

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७२११,१२ आणि १४ फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211,12 , 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in